# बाळाला जुलाब सुरु झाल्यास हे करा.

- बाळ अंगावर पीत असल्यास पाजणे सुरु ठेवा, नेहमीपेक्षा जास्त वेळा अंगावर पाजा.
- बाळाचा नेहमीचा आहार सुरुच ठेवा, मात्र सहज पचतील असे अन्न पदार्थ द्या.
- घरच्या जेवणातील वरणाचे पाणी, भाताची पेज, ताक व भरपूर पाणी द्या.
- क्षार संजीवनीचा वापर करा



नारळाचे पाणी



डाळीची पेज



खारे ताक



भाताची पेज



फिका चहा

## क्षार संजीवनी तयार करण्याची पद्धत

- हात स्वच्छ धुवा.
- स्वच्छ भांडे घ्या.
- पाकीटातील पावडर भांड्यात टाका.
- एक लिटर स्वच्छ पाणी भांड्यात ओता.
- पावडर पूर्ण विरघळेपर्यंत ढवळा.
- मिश्रणाचा वापर २४ तासापर्यंत करता येतो,
- आवश्यकता भासल्यास पुन्हा नव्याने मिश्रण तयार करा.

## क्षार संजीवनी असे द्यावे

- २ वर्षाखालील मुलांना पेयील तेवढे चमच्याने देत रहा.
- मोठ्या मुलांना पेयील तेवढे घोटघोट द्यावे.
- उलटी होत असल्यास दहा मिनिटे थांबून पाजावे.
- लघवी भरपूर होते किंवा नाही यावर लक्ष ठेवावे.

## मुलात सुधारणा नाही पण ही धोक्याची लक्षणे आहेत

- मूल चिडचिड करते
- मूल अस्वस्थ आहे
- मूल तहानलेले आहे, पाणी घटाघटा पिते
- मूल मलुल / सुस्त आहे.
- शौचामध्ये रक्त / आंव पडणे

अशी लक्षणे दिसल्यास त्वरीत दवाखान्यात न्या.



क्षारसंजीवनी

(ओ.आर.एस. पाकीट)

राज्य कुटुंब कल्याण कार्यालय पुणे १. द्वारा प्रकाशित.